30 MAR 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णा भाऊंच्या साहित्यात स्वातंत्र्याची प्रेरणा

## डॉ. श्रीपाल सबनीस; अध्यासनातर्फे ग्रंथ प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : अण्णा भाऊ साठे यांचे लोकशाहीर संज्ञेच्या पलीकडे साहित्यिक आणि विचारवंत म्हणून स्वतंत्र मूल्य असून ते अधोरेखित करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग व अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे डॉ. लक्ष्मण साठे लिखित 'अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनाचे पैलू' ग्रंथाचे प्रकाशन आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अशा कार्यक्रमात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनाचे पैलू' ग्रंथाचे प्रकाशन करताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. व्ही. एन. शिंदे व लेखक लक्ष्मण साठे.**

डॉ. सबनीस म्हणाले, "अण्णा भाऊंच्या समग्र साहित्यात स्वातंत्र्याची प्रेरणा व शोषणाविरुद्धचा हुंकार आहे. समतावादी भूमिकेतून लिहिलेल्या साहित्याच्या केंद्रस्थानी माणूस आहे. त्यांच्या साहित्यातील भाषिक सौंदर्य नादावून टाकणारे आहे. स्वातंत्र्यासह विश्वाचे मूल्यभान जीवनाच्या जाणिवेतून अभिव्यक्त करणाऱ्या अण्णा भाऊंच्या साहित्याने देशाची एकता व अखंडता अबाधित राखण्याचे भान जागते ठेवले. लक्ष्मण साठे यांनी त्रयस्थपणे संशोधन करत ग्रंथात अण्णांमधील तत्त्वज्ञ अप्रत्यक्षरित्या अधोरेखित केला आहे."

कुलगुरू डॉ. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व लक्ष्मण साठे यांनी मनोगत व्यक्त केले. अधिविभागाच्या विद्यार्थ्यांचा ग्रंथ भेट देऊन सत्कार केला. यात तसलिम मुल्ला, नूतन सूर्यवंशी, अश्विनी सूर्यवंशी, ज्योत्स्ना भाटवडेकर, भक्ती नाईक, हणमंत नागरगोजे, जयश्री शिंदे, विनायक सरदेसाई, केवल वेटम यांचा समावेश होता.

अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. राजेश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

पुढारी



कोल्हापूर : सायबर शिक्षक पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आर. के. कामत यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

# डॉ. उर्मिला पोळ यांच्या 'सायबर शिक्षक'चे प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागातील सहायक प्रा. डॉ. उर्मिला पोळ यांच्या 'सायबर शिक्षक' या पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.

सायबर सुरक्षा विषयातील मूलभूत ज्ञान प्रामुख्याने इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे. या विषयातील संकल्पना सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवणे हे एक आव्हान आहे. या पुस्तकामुळे सायबर सुरक्षा, संभाव्य सायबर हल्ले; सायबर सुरक्षाविषयक कायदे, सायबर सुरक्षेमधील शिक्षण व रोजगार संधी याविषयी सर्वसामान्य लोकांमध्ये जागरूकता निर्माण होईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

प्रास्ताविक संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. के. एस. ओझा, डॉ. व्ही. एस. कुंभार, श्री. जयकुमार भोसले, डॉ. स्मिता काटकर, डॉ. शीतल गायकवाड उपस्थित होते.

30 MAR 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शून्य उत्सर्जनासाठी विद्यापीठ मदत करणार

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन : 'नेट झिरो एमिशन : ए ग्लोबल नेसेसिटी'वर कार्यक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

निव्वळ शून्य उत्सर्जन साध्य करण्यासाठी आज जगभरात विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. अशा प्रकारचे प्रयत्न स्थानिक पातळीवरही भरीव प्रमाणात व्हायला हवेत, या प्रयत्नांना शिवाजी विद्यापीठाचे सर्वोतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि इस्लामपूर येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात "नेट झिरो एमिशन : ए ग्लोबल नेसेसिटी" या विषयावरील व्यवस्थापन विकास कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, ग्लोबल वॉर्मिंग, क्लायमेट चेंज, झिरो कार्बन आणि नेट झिरो एमिशन अशा अनेक संज्ञांनी सामान्य माणूस व कार्यकर्त्यांच्या मनात कुतूहल निर्माण केले आहे. खऱ्या अर्थाने यासंदर्भातील काम नेटाने पुढे नेण्यासाठी काही कार्यकर्ते स्वतःहून समाजात या विषयावर भरपूर काम करत आहेत. अनेकजण एकत्र येवून काम केले तर समाजाला या विषयांचे गांभिर्य लक्षात येईल, या दिशेने प्रयत्न व्हायला हवेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ग्लासगो परिषदेत झालेल्या चर्चेनुसार सन २०७० पर्यंत 'नेट झिरो एमिशन" साध्य करण्यासाठी काय करावे लागेल, या दृष्टीने डॉ. सुभाष आठल्ये, डॉ. मधुकर बाचुळकर व कर्नल शशीकांत दळवी या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. डॉ. राजन पडवळ यांनी कार्यक्रमाची भूमिका विषद केली. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले.

यावेळी विश्व वन्यजीव निधीचे सुहास वायंगणकर, ग्राहक प्रबोधन प्रचार प्रांत समिती प्रमुख सचिन जंगम, दिनकर चौगुले, विश्वास पवार, डॉ. सीमा देसाई, प्रा. अनिकेत परदेशी, अर्जुन थोरात, डॉ. राजन पडवळ, कमलाकर बुरांडे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासोबत कर्नल शशिकांत दळवी, नितीन डोईफोडे, डॉ. सुभाष आठल्ये, डॉ. मधुकर बाचुळकर, कमलाकर बुरांडे, प्रा. मगर आदी.

### अन्यथा तापमानवाढीचे परिणाम भोगावे लागतील

नागरिकांनी हा विषय गांभीर्याने घेतला नाही, तर नजीकच्या काळात तापमानवाढीचे गंभीर दुष्परिणाम मानवाला भोगावे लागतील. वारंवार होणारी चक्रीवादळे, अवकाळी पाऊस, ओला व सुका दुष्काळ आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य अशी संकटे येत राहतील आणि मानवच त्याला कारणीभूत असेल, असा सूर या चर्चे दरम्यान होता.

3 0 MAR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईनमध्ये परीक्षा विभागाची घोडदौड

## प्रश्नपत्रिका ते निकालापर्यंत सर्व कार्यपद्धती ऑनलाईनच, पेपरलेस दीक्षांत समारंभातही यश

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील परीक्षा विभाग अलीकडे अत्याधुनिक संगणक प्रणालीचा वापर केल्याने ऑनलाईन परीक्षेपासून निकालापर्यंत राज्यभरातील विद्यापीठांमध्ये अव्वल कामगिरी करून आपला वेगळा ठसा उमटवला आहे. दीक्षांत समारंभही यशस्वीपणे पेपरलेस करण्यात यश आले आहे. प्रश्नपत्रिका, परीक्षा, गुणपत्रक, पदवी प्रमाणपत्र, ट्रान्सक्रिप्ट, व्हेरीफिक्केशन ही कामे पेपरलेस आहेत. विद्यापीठाची ही डिजीटल घोडदौड पाहून परदेशी विद्यार्थ्यांचा ओढा येथे वाढत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभाला १०९४ विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रे घेतली होती. आता अट्ठावण्णाव्या दीक्षांत समारंभात ही संख्या ६२ हजार ३६० वर पोहोचली आहे. सुरूवातीला ग्रामीण भागातील विद्यापीठ म्हणून विद्यार्थ्यांना शिक्षणासह नोकरीच्या ठिकाणी नाकारले जायचे. परंतु याच विद्यापीठाने संशोधनात जागतिक पातळीवर आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. संशोधनात एस. एस. पवार यांच्यापासून संशोधन



प्रकल्प मिळवण्याची प्रथा सुरू झाली. सध्या विद्यापीठाला संशोधन अनुदान मोठ्या प्रमाणात मिळत आहे. तसेच ४८ पेक्षा जास्त संशोधकांचा समावेश जागतिक पातळीवरील 'टॉप टू'मध्ये आहे. परीक्षा वेळेत घेऊन वेळेत निकाल लावल्याने राज्यपालांसह इतर विद्यापीठांनीही या विद्यापीठाचे कौतुक केले. याचा परिणाम म्हणून नॅकचे 'ए प्लस प्लस" मानांकन विद्यापीठाला मिळाले. त्यामुळे शैक्षणिकदृष्ट्या विद्यापीठ राज्यात अव्वल असल्याचे पुन्हा सिद्ध झाले आहे.

कोरोना काळात शैक्षणिक संस्थांना ऑनलाईन मोडमध्ये जावे लागले. यामध्येही परीक्षा वेळेत घेऊन तीन दिवसात निकाल जाहीर करण्यात विद्यापीठ यशस्वी झाले. विद्यार्थ्यांची वाढती संख्या पाहता ऑनलाईन परीक्षा कशा घ्यायच्या, असा प्रश्न होता. परंतु ऑनलाईन परीक्षा सुरळीत करण्यासाठी विद्यार्थ्यांना मॉक टेस्टच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले. संगणक प्रणालीद्वारे अपवाद वगळता ऑनलाईन परीक्षा सुरळीत झाल्या. 'ऑफलाईन''मधून 'ऑनलाईन''मध्ये जाण्याची जबाबदारी विद्यापीठाने सक्षमपणे पेलली.

दीक्षांत समारंभात परीक्षा विभागाने पुढचे पाऊल उचलले. पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट विद्यापीठात सादर न करण्याच्या सूचना विद्यार्थ्यांना दिल्या. ऑनलाईनमुळे पेपरलेस दीक्षांत करण्यात परीक्षा विभाग यशस्वी झाला. विद्यार्थ्यांना ई-मेल व एसएमएसद्वारे दीक्षांतची पूर्ण माहिती दिली. आता पदवी घेणाऱ्या ६२ हजार ३६० विद्यार्थ्यांच्या नावांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. विद्यार्थ्यांना पोस्टाने पदवी प्रमाणपत्रे पाठवली गेली आहेत. परिणामी विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा, आणि कष्टही वाचल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

### पुनर्मूल्यांकन ऑनलाईन करा

प्रश्नपत्रिका तयार करणे, महाविद्यालय, अधिविभागांना प्रश्नपत्रिका सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलीवरी सिस्टीम (एसआरपीडी)च्या माध्यमातून पाठवणे निकालापर्यंतचे सर्व कामकाज ऑनलाईन पध्दतीने चालते. ऐवढ्यावरच न थांबता उत्तरपत्रिका फोटो कॉपी, पुनर्मूल्यांकनही ऑनलाईन केले पाहिजे, अशी मागणी विद्यार्थी व पालकांकडून होत आहे.

**परदेशी विद्यार्थ्यांची संख्या :** पदवी व पदव्युत्तर १९, पीएचडी २.

### अधिकारी, कर्मचाऱ्यांमुळे ऑनलाईनमध्ये यश

कुलगुरूंपासून सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांमुळे ऑनलाईन मोडमध्ये परीक्षा घेणे शक्य झाले. कमी कर्मचाऱ्यांमध्ये परीक्षा, निकाल आणि आता दीक्षांत समारंभही घेतला आहे. प्रवेशापासून निकालापर्यंतचा ऑनलाईन प्रवास विद्यापीठाच्या यशात मैलाचा दगड ठरला आहे.

**गजानन पळसे (परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक, शिवाजी विद्यापीठ)**

### विद्यार्थी सुविधा केंद्राचा पाच वर्षात आढावा

| सर्टीफिकेट नाव | २०१७ | २०१८ | २०१९ | २०२० | २०२१ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मार्कशीटची सेकंड कॉपी, | १५६९१ | | | ८४३३ | | ८०५५ |
| मिडीयम ऑफ इन्स्ट्रक्शन, | ८६ | ११९ | १३८ | ९९ | ३०६ | ७४८ |
| ट्रान्सफर व मायग्रेशने सर्टीफिकेट, | ८६१३ | ९२६० | ८७५३ | २३२० | ९५०५ | ३८४५१ |
| पासिंग मेरीट, रँक सर्टीफिकेट, | १६९८ | १७०८ | २३८५ | ११९८ | १५५४ | ८५४३ |
| व्हेरिफिकेशन ऑफ डॉक्युमेंट | ५१३८ | | ३६४० | १७८७ | १५८५ | १६४४६ |
| अटेस्टेशन डॉक्युमेंट | ८३२ | १२५२ | ४०४९ | ६३१ | ४६२ | ४२२६ |
| ट्रान्सक्रिप्ट | ४८४ | ९५७ | ८०६ | ५९८ | ८२६ | ३६७१ |
| चेंज नेम | ८० | १३४ | १३१ | ७८ | ९५ | ५१८ |